22

# मराठी साहित्यातील दारिद्रय

- प्रा.अहिरे रविंद्र महारू
मराठी विभाग
श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा

**सा**हित्य आणि समाज हा मानवी जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. समाजामध्ये सभोवताली घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनाची नोंद आजचे साहित्य करताना दिसुन येते आहे. साहित्याला कोणत्याही विषयाचे बंधन असल्यामुळे सर्व आमच्या विषयाची माहिती आपणासमोर उपलब्ध होवु शकते. पुरातन काळखंडाचा विचार केल्यास आपणास असे लक्षाते येते की, साहित्याचा विषय विशिष्ट व्यक्ती राजा, राणी, सेनापती, शुरवीर योध्दा, संत , देवदेवता, परी, अद्‌भुत रम्य कथा, कहाणी या रूपाने साहित्याची निर्मीती होत होती. मात्र आज वर्तमानकाळ कालखंडात सर्वच विषयांच्या कक्षा वृंदाविल्या आहेत. आज समाज जस जसा साक्षर होत गेला तसतशा पध्दतीने साहित्य साऱ्याच बाबीवर प्रकाश टाकताना दिसतो. काही लेखक, कथा, कादंबरी , आत्मचरित्राच्या माध्यमातुन सख दुखः , गरीबी, भूक, आर्थिक विवेंचना, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती, अशा विषयावर आजचे साहित्यीक प्रकाश टाकताना दिसुन येतात. म्हणुन साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हणतात ते ही खरे आहे. सर्वच जाती धर्मातील, पंथातील घडामोडींची नोंद साहित्यीक करताना दिसुन येत आहे.

आजची समाज रचना मुळात गरीब, श्रीमंत अशी आर्थिक विषमतेवरून समाजाची तीन वर्गात विभागणी झ ालेली आापणास दिसुन येते. श्रीमंत वर्ग, मध्यम वर्ग आणि गरीब वर्ग दलित आणि आदिवासी , भटके समाजाला अठरा विश्व दारिद्रय हे त्यांच्या पाचवीलाच पुजलेले असते . असा हा समाज आजसुध्दा मोठया प्रमाणावर उपेक्षित राहिलेला दिसुन येतो. या समाजासमोर अर्थिक दारिद्रय गरीबी दु:ख आणि भुकेचा प्रश्न आज घडीला एरणीवर आलेला दिसुन येतो. तिचभर पोट भरण्यासाठी पोटाला भाकरीचा तुकडा मिळण्यासाठी दलित, आदिवासी आणि भटक्या समाज भुकेमुळे लाचार आणि गुलाम होताना दिसतात. सर्वच जग आज भाकरीच्या चाकाभोवती माणुस नेहमी फिरत राहीलेला आहे. हा जगाचा नियम आहे. टिचभर पोट भरण्यासाठी माणसं रात्रंदिवस युध्दचा प्रसंग अनुभवतात व यातुन आज आहिरे आणि नाहीरे अशी वर्गवारी निर्माण झालेली आहे. एकीकडे गर्भ श्रीमंत व्यक्तीपुढे भौतिक सुख सुविधा हात जोडुन उभ्या असतात. अशा घरामध्ये घराची राखण करणाऱ्या कुत्र्याला खायला ब्रेड दिला जातो. तर दुसरीकडे दलित आदिवासी आणि भटक्या समाजामध्ये आजसुध्दा एकवेळचे जेवणाला पोरके होताना दिसतात. दलित समाज भुकेपोटी लाचार होतो. भुकेने व्याकुळ होतो. मनात इच्छा असो किंवा नसो भुकेपोटी त्याला मृत झालेला पशु ओढाव्या लागतात. भुकेमुळे याच मेलेल्या पशुचे मांस भक्षण करावे लागते. बाबुराव बागुल यांची ' भुक ही कथा वाचल्यानंतर मन सुन्न

होते. कथेची नायिका भागु कोळीण भिका आणि सटवा नायक यातील भिकाची भिक मोठी आहे. यांचे वर्णन करताना लेखक म्हणतो की,' उपासमारीमुळे दहा घरचे शिळे कालवण अन्न वाळलेले खड तुकडे आवडत नव्हते तरी त्याची भुक मोठी असल्यामुळे खात होता. '(पृष्ठ क्र.२३)

आदिवासी कोकणी समाजात एक म्हण प्रचलित आहे " भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा " ही म्हण बाबुराव बागुल यांची भुक यांच्या कथेतील वर्णन वाचल्यानंतर सार्थक वाटले आहे.

' भुक ', 'तंगाई ' या आत्मकथेत महादेव गायकवाड भुकेचे वर्णन करताना दिसतात. आजोबा आणि नातु खळयावर जातात. नातुला भुक लागते ' मालक म्हणतो भुक लागलीय व्हय रं ? ' मालक माझ्याकडे बघुन म्हणाला, म्यां नुसतीच मान हालविली. तेव्हा मालकाने गडयाला भाकर आणायला लावली. त्यात भाकरीचं गठुडं आणुन देवु लागला तोच मी हात पुढे करून घेवु लागलो. अरारा हात पुढें करू नका खाली उपरनं अंथरा मग त्याने समदं गठुडं टाकलं मग मी गठुड सोडलं त्यात वाळकीखोट कुटकी व्हती त्या कुटक्याला जरा वली कांदयाची तांबी चटणी हायगई न करता सपाटा सुरू चटणी लागलेला तुकडा जरा खमंग लागायचा काही तुकडे सपक लागायचे. काही तुकडे तर दाताने तुकडे तुटतच नव्हते. मी दातांनी बळजबरीने फोडायचो. खाल्लेले गिळायचो नरडयात एक - एक घास उतरत नसायचा. तसा मी रेटुन गिळायचो मध्येच ठसका लागायचा. ' पाणी पी | पाणी जरा दमानं खा की, मरायचं का ? अस मालक सांगायचा ! असे भुकेचे दारद्रियाचे चित्रण रेखाटले आहे हे वाचताना मन सुन्न होते. '

नारायण सुर्वे या कवीने माझे विद्यापीठ ऐसा गा मी ब्रह्मा या कविता संग्रहामधुन कामगारांच्या प्रश्नावर प्रकाश टाकताना दिसुन येतो, नारायण सुर्वे ' दोन दिवस या कवितेत म्हणतात की, '

' शेकडो वेळा चंद्रा आला , तारे फुलले , रात्र धुंद झाली. '

भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली. " (पृष्ठ क्र. ४३)

अशा शब्दात दारिद्रयाचे वर्णन कवी करताना दिसतो. ' चार शब्द या कवितेत नारायण सुर्वे म्हणतात की,

"रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे

कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे

कामगार आहे मी , तळपती तलवार आहे

सार स्वत:नो ! थोडासा मी गुन्हा करणार आहे. ' पृष्ठ क्र. ५२

अशा शब्दात दारिद्रयाचे वर्णन कवी करताना दिसतो.

**समारोप :**

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत या गरजा आहेत. मात्र आर्थिक विषमतेमुळे समाजाची घडी विस्कटीत चालली आहे. प्रत्येक समाजामध्ये दु:ख, दैन्य, भुक, व्याकुळता हे जोपर्यंत आहे ते संपविण्यासाठी साम्यवादी समाज व्यवस्था जो

पर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत ही आर्थिक विषमतेची दरी ही वाढत जाईल. आर्थिक विषमतेमुळे गरीबीचे चटके असेच सहन करावे लागते.

## संदर्भ सुची :-

१. मरण स्वस्त होत आहे . बाबुराव बागुल पृष्ठ क्र.२३
२. अक्षरदीप - संपादन मराठी अभ्यास मंडळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद एज्युकेशनल बुक सप्लायर्स औरंगपुरा औरंगाबाद पृष्ठ क्र.१४३,४४
३. वेदनांचा प्रदेश - मराठवाडयातील दलित आत्मकथने डा.प्रल्हाद लुलेकर कैलास पब्लिकेशन औरगंपुरा औरंगाबाद पृष्ठ क्र.३३
४. काव्यात्मक साहित्य संपादन मराठी अभ्यास मंडळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद एज्युकेशनल बुक सप्लायर्स औरंगपुरा औरंगाबाद पृष्ठ क्र.४३,५२